# Self-help and Self-Governance Movement

Known As

Amhi
Amchya
Arogyasathi

Reg.No. F134 /Gad.

Registered Non-Governmental Organization
Under Relevant Acts in India

# आम्ही आमच्या आरोग्यासाठी

## वार्षिक अहवाल एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014

## ‘माता व नवजात बाळाची काळजी’ नागपुर शहर प्रकल्प, नागपुर

## मराठी नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा



# सहकारी संस्था (AID)

AID (Association of Indian Development) या आंतरराष्ट्रीय संस्थेद्वारे आर्थिक सहकार्य मिळत आहे. ही संस्था अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथे आहे. हा भारतीय अमेरिकन सदस्यांचा एक ग्रुप आहे.

## प्रकल्पाची प्रस्तावना/ कालावधी

नागपूर शहराची लोकसंख्या 24 लाखाच्या जवळपास व त्यापैकी 37 टक्के लोकसंख्या अधिकृत व अनधिकृत वस्त्यांमध्ये राहते. यापैकी 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' द्वारे माता व नवजात बाळाची काळजी हा प्रकल्प नागपूरच्या पूर्व भागातील 9 वस्त्यांमध्ये 51942 लोकसंख्येत प्रकल्पाचे काम सुरु होते. 'माता व नवजात बाळाची काळजी' या प्रकल्पाचा कालावधी 3 वर्षाचा होता. ऑक्टोबर 2014 मध्ये प्रकल्प संपलेला आहे.

या प्रकल्पाद्वारे वस्तीतील गरोदर माता व नवजात बाळाची काळजी घेतली जाते. तसेच वस्ती पातळीवरील आरोग्य समिती व आरोग्य फंड सातत्याने कार्यरत आहेत आणि फेडरेशनच्या कार्याची पाहणी केली जाते .

# प्रकल्पाचे कार्यक्षेत्र

नागपूर शहरातील 9 वस्त्या : भांडेवाडी, चांदमारी, संघर्ष नगर , पडोळे नगर, पँन्थर नगर, हिवरी नगर, कुंभार टोली,ताजबाग, भांडे प्लॉट

# उद्दिष्ट्ये

१) व्यक्ती, कुटुंब व समाजात माता व नवजात बाळाच्या आरोग्यसंबधी वर्तनात घडून आलेल्या बदलामध्ये सातत्य राखणे ज्याद्वारे त्यांच्यातील आजाराचे प्रमाण कमीत कमी होऊन अप्रत्यक्षरित्या मातामृत्यू व नवजात मृत्यूचे प्रमाण पूर्णतः कमी होईल.

२) आरोग्य फंड व फेडरेशन यांचा व्यापक स्वरुपात विस्तार करणे व आरोग्य विम्याशी परिवार जोडणे.

३) आरोग्य समितीद्वारे वस्तीमध्ये लोकांच्या हातात असतील अशा स्थायी स्वरूपाच्या संदर्भ व्यवस्था निर्माण करणे.

# उपक्रम ( एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 )

## प्रकल्पातील वस्तीपातळीवरील कार्यक्रम

| अ.क्र | प्रमुख उपक्रम | एकूण कार्यक्रम | उपस्थिती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला | एकूण |
| 1 | ANC / PNC बैठक | 16 | 0 | 280 | 280 |
| 2 | पुरुष सहभाग बैठक | 19 | 371 | 0 | 371 |
| 3 | मुली जगवा समाज घडवा कार्यक्रम | 1 | 30 | 18 | 48 |
| 4 | वंधत्व निवारण बैठक | 2 | 0 | 18 | 18 |
| 5 | कँन्सर तपासणी शिबीर | 2 | 2 | 65 | 67 |

# उपक्रम ( एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 )

| | प्रमुख कार्यक्रम | प्रकिया | साध्य |
|---|---|---|---|
| 1 | ANC / PNC बैठक | चलचित्र,फ्ल्यँश कार्ड वापर , चीठ्यांचा खेळ, | बैठकी द्वारे सामुहिक आरोग्यशिक्षण. महिलांच्या व कुटुंबातील सदस्यांच्या वर्तनात सकारात्मक बदल, घरातील इतर महिलांच्या आरोग्यविषयक गैरसमजदूर होऊन वाढता सहभाग. |
| 2 | पुरुष सहभाग बैठक | पुरुषांशी संबधित समस्येवर चर्चा सत्र, Feedback form भरून पाठपुरावा करण्यात आला. | पुरुषांचे प्रकल्पाशी संबंधित सहभागाचे प्रमाण वाढले. पुरुषांना त्यांच्या गुप्त रोगाबाबत चर्चा करता आली. किशोरवयीन मुलांना इतर रोगांविषयी व त्याबाबत काळजी कशी घ्यावी याबाबत माहिती मिळाली. पुरुषांची स्त्रियांबाबत वागणूक सकारात्मक. |
| 3 | मुली जगवा समाज घडवा कार्यक्रम | उत्सवा दरम्यान बँनर व पोस्टर प्रदर्शनी,तज्ञ व्यक्तीद्वारे मार्गदर्शन, दोन मुलींवर नसबंदीकरणाऱ्या महिलांचा भेट वस्तू देवून सत्कार. | कुटुंबात मुलींचा सकारात्मक स्विकार, मुलींचे महत्व, मुली कमी असण्याचे दुष्परिणाम लोकांना काही प्रमाणात समजले आहे. एक किंवा दोन मुलींवर नसबंदीकरणाऱ्या कुटुंबा प्रमाणात वाढ . |
| 4 | वंधत्व निवारण बैठक | तज्ञ डॉक्टरद्वारे मार्गदर्शन, व मोफत उपचार. | बैठकामध्ये सहभागी झालेल्या महिलांपैकी 4 महिलांनी वंधत्व निवारनाकारीता तपासण्या करून मोफत उपचार घ्यायला सुरुवात झाली. |

# उपक्रम ( एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 )

| | प्रमुख कार्यक्रम | प्रकिया | साध्य |
|---|---|---|---|
| 5 | कँन्सर तपासणी शिबीर | राष्ट्रसंत तुकडोजी कँन्सर हॉस्पिटल व स्नेहान्चल वेदनाशमन केंद्र नागपूर यांच्या सहकार्याने वस्त्यांमध्ये कँन्सर तपासणी शिबीर, संशयित रुग्णांचा पाठपुरावा. माहिती हस्तपत्रक तयार केले. | महिलांना असणाऱ्या संसर्गाचे आजारात रुपांतर होऊ शकते याबद्दलची माहिती मिळाली. आजार होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक काळजी घेण्याचे मार्गदर्शन मिळाले.8 संशयित महिलांना पुढील तपासणीकरिता कँन्सर हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले. 4 अविवाहित मुलींना स्त्रीरोग तज्ञाकडे पाठविण्यात आले. 1 महिलेला गर्भाशयाचा कर्करोग आढळून आला. पुढील तपासण्या करून उपचार सुरु करण्यात आले. |



ANC / PNC बैठक



मुली जगवा समाज घडवा' सत्कार कार्यक्रम



कँन्सर तपासणी शिबीर



कँन्सर तपासणी शिबीर

# संख्यात्मक साध्ये

| अ.क्र. | प्रकल्पाचे प्रमुख निर्देशके | 2014 (46932)<br>एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | नवीन गरोदरपण निश्चिती | 373 | |
| 2 | 12 आठवड्यापुर्वी तपासणी | 366 | 98.12 % |
| 3 | 12 आठवड्यानंतर तपासणी | 7 | 1.87 % |
| 4 | एकूण गर्भपात | 11 | |
| 5 | एकूण बाळंतपण | 365 | |
| 6 | 4 तपासण्या व 3 आरोग्यशिक्षण | 283 | 77.53 % |
| | दवाखान्यात | 360 | 98.63 % |
| | घरी | 5 | 1.36 % |
| | सामान्य | 221 | 60.54 % |
| | सिझेरिअन | 140 | 38.35 % |
| | माहिती मिळाली नाही | 3 | 0.8 % |

# संख्यात्मक साध्ये

| अ.क्र. | प्रकल्पाचे प्रमुख निर्देशके | 2014 (46932) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| | | एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 | |
| 7 | एकूण जिवंत जन्म | 362 | |
| | मुले | 116 | |
| | मुली | 182 | |
| 8 | अर्धा ते एक तासातील स्तनपान | 207 | 93.66 % |
| 9 | चिक दुध | 327 | 90.33 % |
| 10 | कमी वजनाचे बाळ | 62 | 17.12 % |
| 11 | एकूण मृतपिंड | 9 | |
| 12 | एकूण नवजात मृत्यु | 6 | |
| 13 | एकूण माता मृत्यु | 0 | |
| 14 | JSY पात्र | 80 | |
| 15 | लाभार्थी | 72 | 90 % |

# (गुणात्मक साध्य) ( केसस्टडी )

**आरोग्यासखी – यास्मीन सय्यद**

**वस्तीचे नाव - बडा ताजबाग ,नागपूर**

मोठा ताजबाग मध्ये 9844 लोकसंख्येअंतर्गत संस्थाचे काम सुरु आहे. ही मुस्लीम लोकांची वस्ती असून जास्तीत जास्त वर्ग मजुरी करणारा आहे. इथे लहानपणापासूनच मुले तंबाखु व खर्रा खातात व काही प्रमाणात महिला व्यसनी आहे. वस्तीमध्ये शाळा सोडणाऱ्या मुलांचे प्रमाण खूप जास्त आहे.

संस्थेद्वारा या ठिकाणी कर्करोग तपासणी शिबीर घेण्यात आले. शिबिरामध्ये रफिका बेगम वय वर्ष 60 या तपासणीसाठी आल्या होत्या. त्यांना मासिक पाळीमध्ये खूप जास्त रक्तस्त्रावाचा त्रास होता त्यासाठी ती जेव्हा तपासणीला आली होती तेव्हा ज्या बेंचवर बसली होती तो पूर्ण रक्ताने भरून गेला होता. तिच्या तपासणी दरम्यान डॉक्टरांनी तिच्या कुटुंबातील सदस्यांना सांगितले की यांना कर्करोग झालेला आहे. त्वरित गर्भाशयाचे ऑपरेशन करावे लागेल रफिक बेगमला खूप त्रास होता पण घरी कोणी नव्हते व तिची आर्थिक परिस्थितीही फारच वाईट होती. डॉक्टर म्हणाले आमची अम्बुलंस असते त्यामध्ये तुम्हाला नेणार व राजीव गांधी योजना अंतर्गत ऑपरेशन होणार पण ती बाई घाबरली व दवाखान्यात जाण्यासाठी नकार दिला मी नंतर विचार करून सांगते असे म्हणाली. रिपोर्ट नुसार तिला गर्भाशयाचा कर्करोग होता. तिच्या घरी सुपरवायझर व आरोग्यसखी पाठपुराव्यासाठी गेले असता तिला व तिच्या कुटुंबातील सदस्यांना कर्करोग बद्दल समजून सांगितले. तरीही ती दवाखाण्यात जायला तयार नव्हती तिला खूप भीती वाटत होती. खूप समजून सांगितल्यावर ती म्हाणाली मी इतके लांब नाही जाणार माझ्या सोबत जाणारे कोणी नाही. मग तिचे पूर्ण पेपर घेवून आम्ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर दवाख्नाना मध्ये गेले. दवाखान्यात चौकशी करून आम्ही दवाखान्यात तिची फाईल बनवून दिली राजीव गांधी आरोग्यदायी योजना अंतर्गत तिचा उपचार सुरु झाला. त्यांना लाईट देणे सुरु आहे आता ते नियमित वेळेवर उपचारासाठी जातात. आता त्यांना काही प्रमाणात आराम आहे. आरोग्यसखीचे म्हणणे आहे -

"रफिका बेगम उठते बैठते दुवा देती है की बेटा मै तुम्हारी बदोलत अब तक जिंदा हु वरना कब की खुदा को प्यारी हो जाती. अल्ला किसीको कॅन्सर जैसी बिमारी न दे अगर दे भी तो तुम जैसे लोग मदद के लिये भेज दे"

# आरोग्य फंड व संगम आरोग्य फंड फेडरेशन
## ( एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 )

| कार्यक्रम | एकूण बैठक | एकूण उप स्थिती | साध्य |
|---|---|---|---|
| नवीन फंड निर्मिती बैठक | 4 | 55 | ( वस्ती- चांदमारी,पवनशक्ती नगर चांदमारी, ताजबाग भांडेप्लॉट) नवीन 2 फंड तयार करण्यासाठी 10 सदस्य तयार झाले. त्यापैकी 5 सदस्यांनी पैसे गोळा केले. |
| फेडरेशन कार्यकारिणी बैठक | 2 | 29 | कार्यकारिणी बैठकी मध्ये गरजू तीन आरोग्य फंडांना आरोग्याच्या कारणांसाठी एकूण 20000 कर्ज देण्यात आले. जे आरोग्य फंड बंद झाले त्यांची मासिक बचत रु. 7260 परत केले. एका फंडाला फिरता निधी 5000 रु. देण्यात आला. |
| नवीन फंडाचा हिशोब लिखाण प्रशिक्षण | 2 | 7 | भांडेप्लॉट मधील दोन नवीन आरोग्य फंडांना हिशोब लिखाण प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणा नुसार व्यवस्थित हिशोब लिखाण करीत आहे.<br>निर्मिती दि.- 14 मार्च 14 – सखी आ. फंड व<br>31 मार्च 14 – गृहिणी आ. फंड |
| संगम आरोग्य फंड फेडरेशनचे ऑडीट | 1 (दि. 22-5-2014 ) | 11 | संगम आरोग्य फंड फेडरेशनचे जुलै 2013 ते एप्रिल 2014 या कालावधीचे जमाखर्च ऑडीट करण्यात आले. साधन व्यक्ती (ऑडीटर) म्हणून कुरखेड्याच्या कुमारीबाई जमकातन होत्या. आलेल्या अहवालातून निव्वळ नफा रु. 9842 निघाला. |







# आरोग्य फंड व संगम आरोग्य फंड फेडरेशन
## ( एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 )

| कार्यक्रम | एकूण बैठक | एकूण उप स्थिती | साध्य |
|---|---|---|---|
| संगम आरोग्य फंड फेडरेशनचे वार्षिक आमसभा (भांडेप्लॉट, भांडेवाडी, कुंभारटोली ) | 3 (वस्ती नुसार) | 135 | सदस्यांना वार्षिक हिशोब कळला.नवीन सदस्यांचे ठराव पारित झाले. प्रत्येक फंडातील एक सदस्य कार्यकारिणी समितीमध्ये घेण्यात आला.जेव्हा आ. फंड बंद होईल तेव्हा एकूण मासिक बचत त्यांना परत मिळेल. आस्था व सपना आरोग्य फंडाला मा. बचत परत करण्यात आली.लक्ष्मी आरोग्य फंडाला बाळंतपण साठी 5000 कर्ज देण्यात आले. |
| संगम आरोग्य फंड फेडरेशन कार्यकारिणी समितीची सर्वसाधारण सभा (भांडे वाडी) | 1 | 39 महिला | नवीन कार्यकारिणीमध्ये नवीन सदस्यांना काम करण्याची संधी मिळाली. प्रत्येक आरोग्य फंडाला फेडरेशनच्या कामाची माहिती मिळेल. कार्यकारिणी समितीची कामे जबाबदारीने करण्याची जाणीव सदस्यांमध्ये निर्माण झाली. |
| संगम आरोग्य फंड फेडरेशनची प्रशिक्षण कार्यशाळा | 1 | 29 महिला | आतापर्यंत संस्थेकडे असणारे रेकार्ड, व्यवहार पुस्तिका हे समितीचे सचिव सांभाळतील. पुढील फेडरेशन बैठक अध्यक्ष व उपाध्यक्ष हे आयोजित करतील. वस्तीतील आरोग्य सुधारण्यासाठी महिलांचे एक संघटन निर्माण करण्याचा निर्णय सदस्यांनी घेतला. |







# संख्यात्मक साध्ये

- **Ixe vkjkX; QM QMj'ku vgoky :- (ऑक्टोबर 2013 ते ऑक्टोबर 2014)**

| एकूण फंड | बंद झालेले फंड | नवीन तयार झालेले फंड | फेडरेशन ला जुळलेले फंड | एकूण सदस्य | वार्षिक बचत | एकूण बचत | कर्ज घेणार्यांची संख्या | एकूण कर्ज | दिलेला फिरता निधी | परत आलेली मुद्दल | परत आलेला फिरता निधी | सेवा शुल्क | बँकेकडून मिळालेले शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **28** | **5** | **8** | **20** | **279** | **27885** | **52566** | **7** | **42000** | **25000** | **29200** | **13000** | **2890** | **4889** |

- 10000 रु. बाळंतपणासाठी २ व्यक्तींना, तापामध्ये झटके येत असलेल्या तीन वर्षाच्या मुलीला 10000 रु.
- 5000 रु. आईच्या डोळ्याच्या ऑपरेशनकरिता ,स्तनातील गाठीसाठी किशोरी मुलीला 7000 रु.
- 5000 रु. नवऱ्याच्या ऑपरेशनकरिता, 5000 रु. नवऱ्याच्या अपघात्त उपचारासाठी.
- 5 आरोग्य फंडच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी फिरता निधी देण्यात आला.
- बँकेत 100000 रक्मेची एफ. डी. करण्यात आली.
- एकूण प्रशासकीय बचत 4259 रुपये आहे.
- बंद झालेल्या 5 फंडाना एकूण मासिक बचत 13970 रु. परत केले.

# आरोग्य समिती उपक्रम
## ( एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 )

| कार्यक्रम | एकूण बैठक | एकूण उपस्थिती | | साध्य |
|---|---|---|---|---|
| | | महिला | पुरुष | |
| राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना | 2 | 36 | 8 | ज्या व्यक्तींचे कार्ड आलेले नव्हते त्यासाठी झोन कार्यालयातून माहिती काढण्यात आली. एका कॅन्सरग्रस्त महिलेला तिच्या उपचारासाठी या योजनेचा फायदा झाला. |
| पिण्याच्या पाण्यासाठी नगर सेवकाकडे अर्ज | 2 | 32 | 11 | ताजुलवरा आरोग्य समिती द्वारे वस्तीतील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी नगर सेवकाकडे सदस्याच्या स्वाक्षरीसह नगर सेवकाकडे अर्ज करण्यात आला. वारंवार पाठपुरावा केल्यानंतर अलीकडे टँकरद्वारे पाण्याची समस्या काही प्रमाणात सुटली आहे. |
| रमाई घरकुल योजना(झोपडपट्टीपुनर्वसन प्राधिकरण योजना ,नागपूर) | 4 | 73 | 21 | 50 घरांचे बांधकाम सुरु झाले आहे. प्रक्रिया सुरु आहे. |
| सुकन्या योजना | 3 | 51 | | 2014 मध्ये जन्मलेल्या मुलींचे अंगणवाडी मध्ये फार्म भरण्यात आले. |
| रस्त्यावरील साचलेल्या नाल्यांची साफसफाई व नळ योजना | 6 | 91 | 26 | नाल्यांच्या साफसफाई चे काम सुरु झाले आहे. वस्तीत नळ पाईप लाईन चे काम सुरु झाले आहे. |

# आरोग्य समिती उपक्रम

## ( एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 )

| कार्यक्रम | एकूण बैठक | एकूण उपस्थिती | | साध्य |
|---|---|---|---|---|
| | | महिला | पुरुष | |
| घर व नाल्याचे बांधकाम ( उज्ज्वल आरोग्य समिती, हिवरी नगर) | 1 | 35 | | आमदार व नगरसेवक यांनी घर वाहून गेलेल्या घरमालकाला 5000 रुपये आर्थिक मदत दिली. तातडीने नागनदीची भिंतबांधून देण्यात आली. |
| डासांच्या वाढत्या प्रकोपावर उपाययोजना | 2 | 37 | | वारंवार पाठपुराव्यानंतर महानगरपालिका द्वारा डास प्रतिबंधात्मक फवारणी करण्यात आली. लोकांनी साचलेले पाणी नष्ट करून आपला परिसर स्वच्छ ठेवतात.नगर सेवकांनी डबके बुजविण्यासाठी भरण टाकण्याचे मान्य केले. |









# आरोग्य समिती ( केसस्टडी )

## "मुलापेक्षा मुलगी बरी ! प्रकाश देई दोन्ही घरी !!"

मोठा ताजबाग ही ताजुद्दीन बाबाच्या नावाने प्रसिद्ध असलेली मुस्लीम लोकांची खूप मोठी वस्ती आहे. बेरोजगारी व कमी शिक्षण जास्त प्रमाणात आढळून येते. मुलाची वाट बघता बघता कुटुंबात बाळांची संख्या वाढून जाते. मुलींचा सन्मान होत नाही. मुलींना जास्त शिक्षण नाही, महत्व नाही,लवकर लग्न व 'लडकी दुसरो की अमानत है' असे विचारधारा ठेवणारे लोक आहेत. याच वस्तीत आझाद कालोनी या स्लम मध्ये रुक्सार एजाज शेख ही महिला राहते. तिचे वय 22 आहे. सासरे भाजी विकतात, पती कुलरचे काम करतात, तिची नणंद रेडीमेड थैलीचा माल आणून शिवते. रुख्सारचे घर छोटेसे आहे. रुक्सार गरोदर असताना आपली चांगली काळजी घेत होती. वस्तीत समितीची बैठकीमध्ये सुकन्या योजना बद्दल माहिती सांगण्यात आली. बैठकीला रुक्सार हजर होती. लोकांचे मुलीविषयीचे विचार बदलण्यासाठी, घरी मुलींचा स्वीकार वाढला पाहिजे, मुलीना बोझ नाही समजल्या पाहिजे म्हणून सरकारकडून 'सुकन्या योजना' आलेली आहे. मुलगी झाल्यानंतर सरकार मुलीच्या नावाने काही रक्कम ठेवतात व मुलीचे वय 18 वर्ष होण्याआधी 21 हजार 200 रुपये शिक्षणासाठी व 18 वर्ष पूर्ण झाल्यानंतर एकूण 1 लाख मिळणार. पण मुलीचे लग्न 18 वयानंतरच व शिक्षण 10 वी पर्यंत होणे आवश्यक . यासाठी अंगणवाडी मध्ये फॉर्म व लागणारे कागजपत्रक बद्दल माहिती सांगण्यात आली. रुक्सारचे डागामध्ये बाळंतपण झाले. तिला मुलगी झाली घरचे सगळे खुश होते. त्यांनी आरोग्य सखीची मदत घेऊन पूर्ण कागदपत्र तयार केले. अंगणवाडी मध्ये जाऊन फॉर्म भरून दिले. तिला या योजनेचा लाभ मिळाला. रुक्सारच्या घरच्यांना खूप आनंद झाला. ते म्हणाले की गरीब लोकांना आर्थिक स्वरुपात आधार मिळाला. मुलीचे पुढच्या भविष्य उज्वल होऊ शकते व तिला मिळणारा पैसा तिचे शिक्षणसाठी वापरणार. समिती बैठकीमध्ये मिळालेल्या माहिती मुळेच आम्हाला लाभ मिळाला नाही तर आम्हाला माहिती कुठून मिळाली असती. त्यांनी सुपरवाइजर व आरोग्यसखीचे आभार मानले.

**" मुलगी ही भार नाही, आधार आहे "**

# क्षमता बांधणी उपक्रम
## ( एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 )

- दि. 25 एप्रिल 2014 ला बल्लारशा येथे आरोग्य फंडाचे अहवाल लेखनाचे पाठपुरावा प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षक नागपूर ऑफिसच्या श्रीमती नसरीन अन्सारी होत्या. प्रशिक्षणाकरिता १५ आरोग्यफंडातील सदस्य उपस्थित होते. प्रशिक्षणासाठी प्रश्नावली, अहवाल लिखाण प्रात्यक्षिक कृती व चर्चा या माध्यमाचा उपयोग करण्यात आला.



- आरोग्यसखी मिटिंग – आरोग्यसखींच्या एकूण कामाचा आढावा घेण्यात येतो. प्रकल्प संपल्यानंतर ही त्या कार्यरत राहाव्यात म्हणून वस्तीतील लोकांकडून आपल्या दिलेल्या सेवेचे पैसे घेण्याविषयी मार्गदर्शन देण्यात आले.



- दि. 17 नोव्हेंबर 2014 गोवंडी बैगनवाडी मुंबई येथील 'लोकसेवा संगम' या संस्थेला भेट देण्यात आली. त्यामध्ये कार्यक्षेत्र भेट, किशोरी मुलींची बैठक व क्षयरोग उपचारासाठी असलेल्या डॉट सेंटर ला भेट देण्यात आली तसेच अंगणवाडी ला भेट देऊन एकूण परिस्थिती समजून घेण्यात आली. 'लोकसेवा संगम' ही संस्था शिक्षण, कुष्ठरोग, क्षयरोग व लोकाधारित देखरेख सेवा या विषयावर काम करते. लोकांची व वस्तीची एकूण परिस्थिती समजून घेण्यात आली. संस्थेची काम करण्याची पद्धत समजून घेण्यात आली.



# माध्यमात दाखल - प्रिंट आणि इलेक्ट्रोनिक मिडिया कवरेज












# शिकवण – अडचणी – आव्हाने ( L P C )

| शिकवण | अडचणी | आव्हाने |
|---|---|---|
| ▪ नागपूरमधील आरोग्यविषयक प्रश्न, समस्यांचा अभ्यास करता आला.<br>▪ महिलां मधील आरोग्यविषयक सजकता समजून घेण्यात आली.<br>▪ किशोरवयातली मुलांना आपले प्रश्न मांडण्याकरिता जागा उपलब्ध नाही त्यांच्या सोबत काम कण्याची गरज आहे.<br>▪ कर्करोग बद्दल लोकांमध्ये भीती व गैरसमज आहे. वस्तीतील महिलांना आरोग्याशी निगडीत माहिती मिळाल्यास महिला जागरूक होतात. | ▪ पुरुषांचा अल्प सहभाग.<br>▪ स्थलांतराचे वाढते प्रमाण.<br>▪ शासकीय योजनांमधील गोंधळ.<br>▪ वस्त्यांपासून सरकारी दवाखाने लांब अंतरावर .<br>▪ शिक्षणाचा अभाव.<br>▪ पारंपारिक प्रथांचा पगडा.<br>▪वस्तीतील किशोरवयातली मुलांना एकत्रित आणणे व त्यांचा सोबत संवाद साधणे.<br>▪सदस्यांसोबत वेळेचे नियोजन करणे.<br>▪ भाषेचा अडथळा. | ▪ स्थानिक आर्थिक संसाधनांचा अभाव.<br>▪ नागपुर शहरामध्ये आरोग्य सेवांचे व्यवस्थापन सुनियोजीत नाही अशा परिस्थितीत काम करणे.<br>▪ शासकीय योजनांमधील योग्य माहिती लोकांपर्यंत पोहचविणे.<br>▪ वस्त्यांमधील आरोग्य बिघडविण्यास पोषक वातावरण.<br>▪माता व नवजात बाळाची काळजी हा प्रकल्प संपलेला आहे.<br>▪ इंग्लिश मधील दस्तऐवज फारच कमी.<br>▪ लोकांसोबत अपूर्ण संवाद. |


THANK YOU
धन्यवाद!!